# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### क्रीडा विभाग

सकाळ

# राजगुरुनगर महाविद्यालय प्रथम

## वेटलिफ्टिंग, शरीरसौष्ठव स्पर्धेत जिल्ह्यातील ४८ स्पर्धकांचा सहभाग

**राजगुरुनगर, ता. १७ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांतील ४८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. वेटलिफ्टिंग स्पर्धेत सांघिक विजेतेपद हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकावले.**



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील शरीरसौष्ठव स्पर्धेत पोझ देताना स्पर्धक.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीअंतर्गत आयोजित मुलांच्या वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धा पार पडल्या.

शरीरसौष्ठव स्पर्धाही ६० किलो वजनी गटापासून ९० किलोपर्यंत विविध वजनी गटांत घेण्यात आल्या. यामध्ये सानी थोरात, आदित्य गोळे, रोहन टेकावडे, श्रेयस कुलथे, प्रणेश कारभारी, साहिल राठोड, संकेत काळे यांनी पारितोषिके पटकावली. एमएमआयटी महाविद्यालयाचा रोहन टेकावडे यास 'बेस्ट पोझर' पोरितोषिकाने गौरविण्यात आले. स्पर्धेचे पंच म्हणून सुधीर म्हाळसकर, प्रा. अनिल मरे, डॉ. शिवाजी भिंताडे यांनी काम पाहिले.

**ऋषिकेशला बेस्ट लिफ्टर पुरस्कार**

वेटलिफ्टिंग स्पर्धा ५५ किलो, ६१ किलो, ६७ किलो, ७३ किलो, ८१ किलो, ८९ किलो, ९६ किलो व १०९ किलो वजनी गटात घेण्यात आल्या. यामध्ये निरजकुमार यादव, ऋषिकेश पाटील, नितीन वाळुंज, संदीप वाडेकर, ऋतुराज गायकवाड, चिराग वाघावले, नितीन होळकर, कुणाल पाडील, अमित वाळुंज यांनी पारितोषिके पटकावली.

पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयाचा ऋषिकेश चव्हाण यास 'बेस्ट लिफ्टर' पुरस्कार देण्यात आला.

Pune, District-Today
18/09/2019 Page No. 4

पुढारी

# शरीर संपत्तीचे जतन आवश्यक : अ‍ॅड. बुट्टे पाटील

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर शरीर संपत्तीचे जतन करणे आवश्यक आहे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीअंतर्गत वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव (मुले) स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या वेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, जिल्हा क्रीडा समिती सचिव डॉ. गिरीश ढमाले, सहसचिव डॉ. पांडुरंग लोहटे, प्रा. डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, विविध महाविद्यालयांतून आलेले शारीरिक क्रीडा संचालक उपस्थित होते.



**शरीरसौष्ठव स्पर्धेतील विजेता खेळाडू पोझ देताना.**

या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील एकूण १५ महाविद्यालयांतील ४८ स्पर्धकांनी सहभाग घेतला. वेटलिफ्टिंग स्पर्धा ५५ किलो, ६१ किलो, ६७ किलो, ७३ किलो, ८१ किलो, ८९ किलो, ९६ किलो व १०९ किलो वजनी गटात घेण्यात आली. यात अनुक्रमे निरजकुमार यादव, ऋषिकेश पाटील, नितीन वाळुंज, संदीप वाडेकर, ऋतुराज गायकवाड, चिराग वाघावले, नितीन होळकर, कुणाल पाटील, अमित वाळुंज यांनी पटकावला. पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयाचा ऋषिकेश चव्हाण यास बेस्ट लिफ्टर पुरस्कार देण्यात आला. तर वेटलिफ्टिंग स्पर्धेचे सांघिक विजेतेपद राजगुरू महाविद्यालयाने पटकावले.

शरीरसौष्ठव स्पर्धाही ६० किलो वजनी गटापासून ९० किलोपर्यंत विविध वजनी गटात घेण्यात आली. यामध्ये सानी थोरात, आदित्य गोळे, रोहन टेकावडे, श्रेयस कुलथे, प्रणेश कारभारी, साहिल राठोड, संकेत काळे यांनी पटकावला. एम. एम. आय. टी. महाविद्यालयाचा रोहन टेकावडे यास बेस्ट पोझर पारितोषिकाने गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे पंच म्हणून सुधीर म्हाळसकर, प्रा. अनिल मरे, डॉ. शिवाजी भिंताडे यांनी काम पाहताना स्पर्धक खेळाडूंच्या पीळदार शरीरयष्टीचं गुणात्मक निरीक्षण करून निकाल जाहीर केला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळुक यांनी केले. आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

My Gramin Edition
17 Sep, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख